।। सर्वभूतहिते रताः ।।

# स्वगृही सेवा संस्था रत्नागिरी .

(राजी क्र.F/ ३५९८ रत्नागिरी ३१.०५. २००८)
४८३, गणेशवाडी , नेने हायस्कुल जवळ,
शिरगांव, रत्नागिरी -४१५६२९.

## स्वगृही सेवा संस्था अंतर्गत

# `शिरीषालय` नियमावली

1.स्वगृही सेवा संस्था सर्वांसाठी खूली राहील.
2.स्वगृही सेवा संस्थेमध्ये ६० वर्षांवरील स्त्री किंवा पुरुषांना प्रवेश दिला जाईल. दांपत्यांपैकी पुरुषांच्या बाबतीत वयाचे बंधन पाळले जाईल.
3.प्रवेश अर्जासोबत ब्लड ग्रुपसहीत वैद्यकीय दाखला व त्यासोबतच पासपोर्ट साईज २ फोटो, आधार कार्ड ,रेशन कार्डची सत्यप्रत , दोन वारसदरांची नावे, त्यांचे पूर्ण पत्ते व दूरध्वनी क्रमांक द्यावे लागतील.
4.प्रवेश घेताना जर एखाद्या व्यक्तीकडे कोणत्याही प्रकारचा गंभीर, संसर्गजन्य आजार आढळल्यास त्या व्यक्तीला प्रवेश द्यावयाचा किंवा नाही याबाबतचे सर्व अधिकार संस्थेकडे राहतील.
5.वारस क्रमांक एक हयात असेपर्यंत तोच त्या निवासी व्यक्तीचा वारसदार समजण्यात येईल. वारसदार एकच्या मृत्यूनंतर वारसदर क्रमांक दोन हा निवासी व्यक्तीचा वारसदार ठरेल.
6.आजारपणआतील औषध पाण्याचा खर्च ज्याचा त्याने करायचा आहे.

7.स्वगृही सेवा संस्थेमधील वास्तव्यादरम्यान एखाद्या व्यक्तीला काही गंभीर आजार झाल्यास तिला रुग्णालयात दाखल करण्याची व्यवस्था  केली जाईल .रुग्णालयातील व्यवस्थेस संस्था जबाबदार राहणार नाही. सभासदाच्या नातेवाईकास /वारसास उपलब्ध संपर्क साधनांद्वारे शक्य तितक्या लवकर कळविण्याची व्यवस्था केली जाईल.

8.एखाद्या व्यक्तीचे स्वगृही सेवा संस्थेमध्ये निधन झाल्यास त्याच्या नातेवाईकांना किंवा वारसदाराला ताबडतोब कळविण्यात येईल. तसे कळवूनही आठ तासाच्या आत कुणीही नातेवाईक न आल्यास त्या व्यक्तीचे अंतिमसंस्कार करण्याचा निर्णय हा संस्थेचे तत्कालीन पदाधिकारी घेतील.

9.स्वगृही सेवा संस्थेमध्ये राहावयास येणाऱ्या व्यक्तींना येताना आपल्याबरोबर मौल्यवान वस्तू आणू नयेत. अशा वस्तू ग्रहाला झाल्यास संस्था त्याला जबाबदार राहणार नाही. म्हणून येतं फक्त दैनंदिन वापराचे सामान आणावे उदा. दैनंदिन प्रसाधने, दंतमंज, टूथपेस्ट, दाढीचे सामान, तेल, कंगवा व स्वतःचे कपडे इत्यादी.

10.निवासींना खोलीमध्ये स्टोव्ह , रॉकेल , कोळशाची शेगडी , गॅस वा तत्सम ज्वालाग्राही पदार्थ वस्तू वापरता येणार नाहीत. स्वत: स्वयंवयंपाक बनवण्यास परवानगी नाही.

11.स्वगृही सेवा संस्थेच्या परिसरात धूम्रपान, मद्यपान व मांसाहार इ. सक्त मनाई आहे .

12.एखाद्या सभासदाला संस्थेमध्ये काही काळानंतर रहावयास यावयाचे असल्यास तसे त्याने लेखी पत्राद्वारे संस्थेला कळविले पाहिजे .

13.संस्थेतून बाहेर जावयाचे असल्यास, संस्था सोडून जायचे असल्यास किमान एका महिन्याची लेखी सूचना द्यावी लागेल .

14.एखाद्या सभासदाला काही काळ संस्थेतून बाहेर जावयाचे असल्यास त्याने त्याविषयीची लेखी सूचना व्यवस्थापकास देणे आवश्यक आहे .

15.एखाद्या सभासदाने नियमांचे आणि शिस्तीचे पालन न केल्यास अशा सभासदाला पूर्वसूचना देऊन संस्थेमधून कमी करण्याचा अधिकार संस्थेकडे राहील .

16.संस्थेमधून निघून गेलेल्या व्यक्तीस पुन्हा प्रवेश घ्यावयाचा असल्यास तो विश्वस्त मंडळाच्या परवानगीने दिला जाईल .

17.एखाद्या सभासदाला काही अपरिहार्य कारण्यासाठी जास्त कालावधीसाठी संस्थेबाहेर जावयाचे असल्यास संस्थेच्या व्यवस्थापकास कामाचे स्वरूप, अंदाचे लागणारा वेळ आणि ठिकाण इत्यादी माहिती द्यावी व तशी नोंद नोंदवहीमध्ये करावी .

18.गंभीर आजारात मदतनीसाची गरज भासल्याच सशुल्क व्यवस्था केली जाईल .